23-01-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 22-01-2025 22:49 Page 1



## निवडक

### घनश्याम केरकरला कॅरम स्पर्धेचे जेतेपद



**सडये : कॅरम स्पर्धेच्या विजेता घनश्याम केरकर यांना जेतेपदाचा चषक प्रदान करताना आमदार लोबो. सोबत मान्यवर.**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**शिवोली, दि. २२ :** कामूर्ली शिवोली मर्यादित उज्वला तुकाराम चोपडेकर स्मृति कॅरम एकेरी स्पर्धेचे विजेतेपद घनश्याम केरकर ने पटकावले. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात केरकर यांनी प्रवीण गोवेकर यांचा पराभव केला. सडये पंचायत सभागृहात या स्पर्धेचे सडये स्टारसच्या वतीने मोहित चोपडेकर यांच्याकडून आयोजन करण्यात आले होते. अंतिम सामन्यातील बक्षीस वितरण प्रसंगी शिवोलीच्या आमदार दिलायला लोबो यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर सरपंच दीपा पेडणेकर, उपसरपंच निलेश वायंगणकर, पंच सदस्या शीला शिरोडकर, शाहू कलंगुटकर, ओमकार हरमलकर, सचिन मांजरेकर, समाजसेवक मोहित चोपडेकर, श्रद्धा चोपडेकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

---

### श्रीगोमंतेश्वर देवस्थानच्या अध्यक्षपदी विजय केळुस्कर



■ *टीम दैनिक हेराल्ड*

**वास्को, दि. २२ :** बायणा वास्को येथील विश्वस्त श्री गोमंतेश्वर देवस्थान मंडळाची आमसभा होऊन पुढील तीन वर्षासाठी खालील प्रमाणे नूतन समितीची निवड करण्यात आली. अध्यक्ष: विजय केळुस्कर, उपाध्यक्ष – संदेश गिरप, सचिव – प्रेमानंद गिरप, खजिनदार – शिवदास नाईक. सदस्य – अमर सुर्लीकर, तुळशीदास शेर्लेकर व अशोक शेर्लेकर अशी नूतन समिती नियुक्त करण्यात आली आहे.

---

### बार्देश तालुका शिवजयंती समारोह समितीची २५ रोजी बैठक

■ *टीम दैनिक हेराल्ड*




**पणजी, दि. २२ :** बार्देश तालुका शिवजयंती समारोह समितीच्या बैठकीचे आयोजन शनिवार दि. २५ रोजी म्हापसा येथील हॉटेल सत्यहीराच्या मिनी सभागृहात संध्याकाळी ५.३० वाजता करण्यात आले आहे.
या बैठकीचा मुख्य विषय १९ फेब्रुवारी २०२५ रोजी साजऱ्या होणाऱ्या शिवजयंतीसाठी समितीची निवड करणे व कार्यक्रमाची रूपरेषा आखणे हा असून, सर्व शिवप्रेमींनी या बैठकीला उपस्थित राहावे अशी विनंती करण्यात आली आहे. आपला डॉ. गुरुदास भालचंद्र नाटेकर

---

### दूरदर्शनवर आज रमेश तवडतरांची मुलाखत

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**पणजी, दि. २२ :** सभापति डॉ. रमेश तवडकर उद्या दूरदर्शनवर (२१ जानेवारी) नावेली वार्ताहरगोवा विधानसभेचे सभापति व काणकोणचे आमदार डॉ. रमेश तवडकर ह्यांची मुलाखत खास कार्यक्रमात उद्या २३ जानेवारीला संध्याकाळी ७ वाजता दूरदर्शनवर प्रसारित केली जाणार आहे. लोक कलाकार आणि शिक्षक सर्वानंद देसाई ह्यांनी ही मुलाखत घेतली असून सभापति डॉ. रमेश तवडकरांच लहानपण, सामाजिक आणि राजकीय कारकीर्द, आदर्श युवा संघाची स्थापना, श्रम धाम, लोकोत्सव आदी संकल्पनावर बोलणार आहे.आमोणा, पैगिण, काणकोण इथे अती ग्रामीण भागात बलराम निवासी शाळा संकुल व आणखी ६ शाळा स्थापन करून शिक्षणाबद्दल असलेले महत्त्व ते विषद करणार आहे.गोवा दूरदर्शनचे राजेंद्र नरसिंव फडते ह्यांनी ही मुलाखत ध्वनिमुद्रित केली आहे.

---

### कृष्णा पालयेकर २५ रोजी गोवा दूरदर्शनवर

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**पेडणे, दि. २२ :** गोवा दूरदर्शनवर पेडणे येथील नवचेतना युवक संघाचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते कृष्णा पालयेकर यांची मुलाखत शनिवार दि. २५ रोजी संध्याकाळी ७ वाजता प्रक्षेपित होईल. ही मुलाखत लेखिका निमा आमोणकर यांनी घेतलेली आहे. दूरदर्शनच्या निर्मात्या चंपा पणजीकर यांनी या कार्यक्रमाची निर्मिती केली आहे.
या मुलाखतीत बालपण आणि शिक्षणाबद्दल माहिती, शालेय जीवनातलं व्यक्तिमत्व, राष्ट्रीय युवा संसद मध्ये गोवा राज्याचे केलेले प्रतिनिधित्व, नवचेतना युवक संघाची स्थापना, कोविड काळातलं नवचेतना युवक संघाचे काम, पर्यटनातलं वेगळेपण, प्रेरणास्थान, विधवा बायकांच्या पुनर्वसनासंबंधित जनजागृती, वक्ता सूत्रसंचालक म्हणून घडण्यासाठीचे प्रयत्न, गोवा विद्यापीठात मिळविलेले यश, मूर्तिकार म्हणून अनुभव, गोवा मुक्ती संग्रामावरील मुक्ती गीता संबंधी, त्यांनी सुरू केलेल्या मोहिमी याविषयी या मुलाखतीत माहिती मिळणार आहे.

---

### तुळशीमळा येथे २४ रोजी रुद्रेश्वर देवाची रथयात्रा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. २२ :** गोव्यातील हरवळे सांखळी येथील भंडारी समाजाचे आराध्य दैवत असलेल्या रुद्रेश्वर देवाची रथयात्रा सध्या गोव्यातील बाराही तालुक्यांमध्ये ६ जानेवारी ते २७ जानेवारी दरम्यान २१ दिवस प्रवास करत असून या पवित्र रथयात्रेचे आगमन शुक्रवार दि.२४ रोजी रात्री ८ वाजता पर्ये मठ तुळशीमळा येथील भक्ती कुटिरकडे होणार आहे. भक्तांनी रथयात्रेचे स्वागत करण्यासाठी याठिकाणी वेळेपूर्वी उपस्थित रहावे. रथ वाळपई येथून हरिनामाच्या गजरात तुळशीमळा येथे येणार असून भाविक या मिरवणुकीत स्वतःच्या वाहनाने सहभागी होऊ शकतात.सुवासिनींद्वारे आरती ओवाळण्यात येणार आहे.त्यानंतर महाआरती व महाप्रसाद होईल.या सोहळ्याचे आयोजक तुळशीमळा, तळी,मठ,बाग,पर्ये व मोर्ले येथील भक्तगण आहेत.अधिक माहितीसाठी उद्धव मांद्रेकर (९६०७६९०१४७),आत्माराम शेट्ये (९४२३३१०४४६) किंवा श्याम पेडणेकर (९०११३८५९२९ ) यांच्याकडे संपर्क साधावा.

---

# भारताचा इंग्लंडवर दणदणीत विजय

### अभिषेक शर्माचे तुफानी अर्धशतक

**कोलकाता, दि. २२ :**

गोलंदाजांनी केलेल्या शानदार कामगिरीनंतर सलामीवीर अभिषेक शर्माच्या (७९) तुफानी अर्धशतकाच्या खेळीच्या जोरावर भारतीय क्रिकेट संघाने इंग्लंडविरूद्धचा पहिला टी- ट्वेंटी सामना ७ गड्यांनी सहज जिंकला. कोलकाताच्या इडन गार्डन मैदानावर खेळविण्यात आलेल्या या सामन्यात इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना भारतासमोर १३३ धावांचे लक्ष्य ठेवले होते. भारताने हे लक्ष्य केवळ १२.५ षटकांत ३ गड्यांच्या मोबदल्यात सहज गाठले. सामनावीरचा पुरस्कार अभिषेकने पटकाविला. या विजयासह टीम इंडियाने ३ सामन्यांच्या टी- ट्वेंटी मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

इंग्लंडकडून मिळालेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचे सलामीवीर संजू सॅमसन आणि अभिषेक वर्मा यांनी शानदार सुरुवात करून दिली. संजू सॅमसनने पहिल्या षटकात फक्त १ धाव घेतली, पण दुसऱ्या षटकात चौकार आणि षटकारचा पाऊस पाडला. दुसऱ्या षटकात सॅमसनने एकूण २२ धावा केल्या, त्यादरम्यान त्याने ४ चौकार आणि १ षटकार मारला. मात्र, चोप्रा आर्चरने भारताला लागोपाठ दोन धक्के दिले. संजू सॅमसन २६ धावा काढून बाद झाला तर कर्णधार सूर्यकुमार यादव खाते खोलण्यापूर्वी माघारी परतला. हे दोघेही माघारी परतल्यानंतर सलामीवीर अभिषेक शर्माने तुफानी खेळीला सुरूवात केली. इंग्लंडच्या गोलंदाजांना सळो की पळो करून सोडले. त्याला तिलक वर्मानेही चांगली साथ दिली. शर्माने तुफानी खेळी करताना केवळ २० चेंडूत अर्धशतक झळकाविले. अर्धशतकानंतरही फटकेबाजी सुरूच ठेवली. मोठा फटका मारण्याच्या नादात अभिषेक बाद झाला.



अभिषेकने ३४ चेंडूत ५ चौकार आणि ८ खणखणीत षटकारांनिशी ७९ धावांची खेळी केली. त्यानंतर हार्दिक पांड्या आणि तिलक वर्माने १२.५ षटकात विजयावर शिक्कामोर्तब केले. भारताने विजयी लक्ष केवळ ३ गड्यांच्या मोबदल्यात गाठले. इंग्लंडकडून आर्चरने दोन गडी तर रशीदने एक गडी बाद केला.

तत्पूर्वी, भारताने नाणेफेक जिंकून इंग्लंडला फलंदाजीस आमंत्रित केले. कर्णधार सूर्यकुमार यादवचा निर्णय सार्थकी ठरवत वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगने पहिल्याच षटकात इंग्लंडला जोरदार धक्का दिला आहे. यष्टीरक्षक फिल साल्ट खाते न उघडताच पॅव्हेलियनमध्ये परतला आहे. अर्शदीपच्या चेंडूवर सॉल्टने शॉट मारण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू मागे गेला आणि सॅमसनने झेल घेतला. त्यानंतर तिसऱ्या षटकात अर्शदीपने बेन डकेटलाही पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. त्याने चार चेंडूत चार धावा काढल्या. यासह, अर्शदीप आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये भारताचा सर्वात यशस्वी गोलंदाज बनला आहे.

एक बाजू जोस बटलरने लावून धरली. पण वरुण चक्रवर्तीने पुन्हा एकदा शानदार गोलंदाजी करून इंग्लंड संघाला अडचणीत आणले आहे. आठवे षटक टाकण्यासाठी आलेल्या वरुणने तीन चेंडूत दोन विकेट घेतल्या. त्यामुळे इंग्लंडचा संघ अडचणीत सापडला. त्यानंतर हार्दिक पांड्याने जेकब बेथेलला आऊट करून इंग्लंडला पाचवा धक्का दिला आहे. त्यामुळे इंग्लंडचा अर्धा संघ ८३धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतला. तद्नंतर अक्षर पटेलनेही आपली कामगिरी यशस्वीरित्या पार पडत जेमी ओव्हरटनला बाद करून इंग्लंडला सहावा धक्का दिला.

#### अर्शदीपने रचला विक्रम

**युवा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगने टी-२० क्रिकेटमध्ये भारतासाठी एक मोठा विक्रम केला आहे. कोलकात्याच्या ईडन गार्डन्स स्टेडियमवर इंग्लंडविरुद्धच्या टी-टेंट्वी मालिकेतील पहिल्या सामन्यात त्याने टीम इंडियाला दमदार सुरुवात करून दिली. त्याने पहिल्या २ षटकात २ विकेट घेत इंग्लंडला बॅकफूटवर टाकले. इंग्लंडने खातेही उघडल नसताना अर्शदीपने पहिली विकेट घेत भारताचं मात्र खात उघडलं. या २ विकेट्स घेत अर्शदीपने मोठा इतिहास लिहिला आहे. अर्शदीप सिंगने पहिल्याच षटकात फिल सॉल्ट आणि त्याच्या स्पेलमधील दुसऱ्या षटकात बेन डकेटची विकेट घेतली. यासह, तो टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारतासाठी सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज बनला आणि त्याने अव्वल क्रमांक गाठला आहे. अर्शदीपने युझवेंद्र चहलचा विक्रम मोडीत काढला. त्याच्या नावावर आता ९७ टी-२० आंतरराष्ट्रीय विकेट्स आहेत. चहलने टी-२० क्रिकेटमध्ये भारताकडून एकूण ९६ विकेट घेतल्या होत्या.**

---

## ‘पेनकॅक सिलट चॅम्पियनशिप २०२५’चे साखळीतील खेळाडूंना तिसरे पारितोषिक

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. २२ :** कोशालीया रिसॉर्ट मंडसौर मध्यप्रदेश येथे डिस्ट्रिक्ट पेनकॅक सिलट असोसिएशनतर्फे आयोजित केलेल्या सहाव्या वेस्ट झोन ‘पेनकॅक सिलट चॅम्पियनशिप २०२५’ या स्पर्धेत साखळीतील स्पर्धकांनी यश प्राप्त केले.

या स्पर्धेत ५ विद्यार्थी सहभागी होत पाचही जणांनी सुवर्ण पदके प्राप्त केली आणि स्पर्धेचे तृतीय पारितोषिक प्राप्त केले.

प्रशिक्षक अजय कार्बोट्कर यांनी फाईट प्रकारात सुवर्णपदक प्राप्त केले. श्रीदा भजे, समर्थ शिरोडकर, अनिरुद्ध गावस व आरव सावंत यांनी फाईट या प्रकारात सुवर्णपदके प्राप्त केली. प्रशिक्षक अजय कार्बोटकर यांना उत्कृष्ट खेळाडूचा सन्मान देण्यात आला.


**कोशालीया : सुवर्णपदके प्राप्त केलेले साखळीतील खेळाडू.**

---

## आयसीसी कसोटी रँकिंग गोलंदाजांमध्ये बुमराह अव्वल स्थानावर

**नवी दिल्ली, दि. २२**

भारताचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह ९०८ गुणांसह आयसीसी कसोटी गोलंदाजी क्रमवारीत अव्वल स्थानावर आहे. फलंदाजी क्रमवारीत टॉप-१० मध्ये दोन भारतीयांचा समावेश आहे. त्याचवेळी वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या कसोटीत पाकिस्तानच्या विजयाचा फायदा नोमान अली आणि सौद शकील यांना झाला आहे. आयसीसीने बुधवारी आपली ताजी क्रमवारी जाहीर केली.




जसप्रीत बुमराह आयसीसी कसोटी गोलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानावर आहे. बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये ३२ विकेट्स घेत ९०७ गुणांचा टप्पा गाठणारा बुमराह पहिला भारतीय गोलंदाज ठरला. आता त्याला ताज्या कसोटी गोलंदाजांच्या क्रमवारीत ९०८ मानांकन मिळाले आहे. त्याच्या मागे ऑस्ट्रेलियाचा पॅट कमिन्स (८४१) दुसऱ्या स्थानावर आहे, तर दक्षिण आफ्रिकेचा कागिसो रबाडा ८३७ रेटिंगसह तिसऱ्या स्थानावर आहे.

त्याचबरोबर पाकिस्तानचा नोमान अली टॉप-१० मध्ये पोहोचला आहे. नोमानने मुलतान कसोटीत वेस्ट इंडिजविरुद्ध ६ विकेट घेतल्या होत्या. नोमान अलीला २ स्थानांचा फायदा झाला असून तो ९व्या स्थानावर पोहोचला आहे. या काळात रवींद्र जडेजाची एका स्थानावर घसरण झाली आणि तो १०व्या स्थानावर घसरला.

पाकिस्तानच्या साजिद खानने (६२१ रेटिंग पॉइंट) १८ स्थानांची झेप घेत २३व्या क्रमांकावर पोहोचला आहे. साजिदने मुलतान कसोटीत ९ विकेट घेतल्या आणि त्याला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले.

---

## साळ येथे विलास राऊत स्मृतिचषक धृती क्रिकेट क्लबने पटकाविला

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साळ, दि. २२ :** साळ क्रिकेटर्स - साळ ने सातव्या साळ प्रीमियर लीग चे साळ हायस्कूल मैदानावर आयोजन करण्यात आले होते . दोन दिवस खेळण्यात आलेल्या या टेनिस चेंडू क्रिकेट स्पर्धेत भूमिका टायगर क्रिकेट क्लब (अक्षय (बंटी) परब), सिद्धांत स्पोर्ट्स क्लब (अनिरुद्ध राऊळ), धृती स्पोर्ट्स क्लब (सचिन राऊत), ऋत्वी क्रिकेट क्लब (रवी पालव) व बाबी इलेव्हन क्लब ( रूपेश राऊत) या पाच संघांनी भाग घेतला होता .

या स्पर्धेत उद्योजक तृषांत राऊत यांनी वडील स्वर्गीय विलास हरिभाऊ राऊत यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ - प्रथम पारितोषिक रु. १५000 व चषक, द्वितीय पारितोषिक रु. १0000 व चषक व इतर सर्व बक्षिसे पुरस्कृत केली होती. या स्पर्धेतील अंतिम सामन्यात ऋत्वी संघाने (रवी पालव) ने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत पाच शतकात ५0 धावा केल्या. तर धावांचा पाठलाग करताना धृती क्लब (कार्तिक राऊत) संघाने दोन चेंडू राखून विजेतेपद पटकावले.

पुरस्कर्ते तृषांत राऊत, पांडुरंग राऊत, कालिदास राऊत, अनिरुद्ध राऊळ आदीच्या हस्ते बक्षीसे प्रदान करण्यात आलीत. त्यात सुमित शेटकर- ऋत्वि (मालिकावीर), संकेत गावस मळीक - धृती क्लब (उत्कृष्ट फलंदाज), बबन ठाकूर - धृती क्लब (उत्कृष्ट गोलंदाज) यांचा समावेश आहे.


**साळ : प्रिमियर लिग विजेत्या संघास विलास राऊत स्मृती चषक प्रदान करताना तृषांत राऊत. सोबत कालिदास राऊत, पांडुरंग राऊत, अनिरुद्ध राऊळ व मान्यवर.**

---

## सातोडे प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद एन. जे. स्ट्राईकर्स संघास

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**सावईवेरे, दि. २२ :** सातोडे - केरी येथील सातोडे प्रिमियर लीग टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद नीरज नाईक यांच्या मालकीच्या एन. जे. स्ट्राईकर्स संघास प्राप्त झाले तर उपविजेतेपद प्रयण धामस्कर यांच्या मालकीच्या दामबाब वॉरियर्स संघास मिळाले.

तृतीय स्थान आकाश दुर्भाटकर यांच्या आराध्या वॉरियर्स, चौथे स्थान सुधीर देसाई यांच्या मालकीच्या सिल्व्हर स्पून युनायटेड, पाचवे स्थान ज्ञानराज नाईक यांच्या मालकीच्या दूधसागर बॉईज संघास प्राप्त झाले. याशिवाय मालिकावीर यश महाले, उत्कृष्ट फलंदाज प्रज्योत नाईक, उत्कृष्ट गोलंदाज आकाश दुर्भाटकर, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक अविनाश हजारे, उत्कृष्ट झेल पवनकुमार नाईक, उत्कृष्ट वेट्ररन्स खेळाडू अभिजीत केरकर, सर्वाधिक धावा यश महाले , सर्वाधिक विकेट्स आकाश दुर्भाटकर, उदयोन्मुख खेळाडू सक्षम नाईक यांना वैयक्तिक बक्षिसे देण्यात आली.

या स्पर्धेचे उद्घाटन नवीन केरकर यांच्या हस्ते करण्यात आले. तर बक्षीस वितरण सोहळा प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक गीतेश वेरेकर, सुधीर देसाई, तन्मय केरकर व प्रकाश गाड केरकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सूत्रनिवेदन सुयोग गुरव यांनी केले तर शेवटी सागर गाड केरकर यांनी आभार मानले. ही स्पर्धा केरी येथील मैदानावर संपन्न झाली.



**केरी - फोंडा : सातोडे प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या विजेत्या एन. जे.स्ट्राईकर्स संघास चषक देताना गीतेश वेरेकर. बाजूस सुधीर देसाई, तन्मय केरकर व प्रकाश गाड केरकर.**

---

## मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल केंद्र सरकार अभिनंदनाचा ठराव

### मराठी राजभाषा संमेलनाचा समारोप : पाच विविध ठराव

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. २२ :** मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल हे संमेलन केंद्र सरकारचे अभिनंदन करते. तसेच गोव्यात मराठीला राजभाषेचा दर्जा देण्यासाठी केंद्र सरकारने गोवा सरकारला सूचित करावे, अशी मागणी करणारा ठराव मांडण्यात आला. मराठी राजभाषा संमेलनाच्या समरोप सोहळ्यात विविध ठराव घेण्यात आले. त्याला सूचक प्रकाश भगत

अनुमोदक - प्रभाकर ढगेयांनी दिले. तसेच राज्य तसेच केंद्र सरकारच्या कार्यालयांचे तसेच शासकीय तथा निमशासकीय आस्थापनांचे फलक मराठी भाषेतून असावेत.

अशोक घाडी, अनुमोदक - उदय ताम्हणकर, मडगाव रेल्वे स्थानकावर मराठीतून उद्घोषणा सुरू केल्याबद्दल तत्कालीन रेल्वे मंत्री पियुष गोयल, त्यासाठी पाठपुरावा करणारे ज्येष्ठ साहित्यिक गो. रा. ढवळीकर व अनुराधा मोघे यांचे हे संमेलन अभिनंदन करीत आहे. राज्यातील सर्व रेल्वे स्थानके, दाबोळी व मोपा विमानतळ येथेही मराठी उद्घोषणा सुरू कराव्या, अशी मागणी करणारा ठराव.सूचक -विजय नाईक अनुमोदक - ॲड. यशवंत गावस मांडला.


**साखळी : समारोप सोहळ्यात विविध स्पर्धेत विजेत्यांना बक्षीस प्रदान करताना राजेंद्र केरकर. सोबत डॉ आरती दिनकर, अशोक घाडी व मान्यवर.**

मराठी भाषेचे जतन व संवर्धन करण्यासाठी कार्यरत असलेल्या सर्व मराठी संस्थांना कोकणी संस्थांएवढेच अनुदान राज्य सरकारने द्यावे, या गतवर्षीच्या ठरावाचा पुनरूच्चार व मागणी हे संमेलन करीत आहे.सूचक - प्रदीप घाडी आमोणकर, अनुमोदक - नरेंद्र आजगावकर दिले.

तसेच राज्यातील मराठी प्राथमिक शाळा वाचवणे ही या राज्यातील भावी पिढ्यांची गरज आहे. त्यासाठी सरकारने सरकारी शाळांच्या अडचणी विनाविलंब सोडवाव्यात, अशी मागणी करणारा ठराव सूचक - संजीव आजगावकर, अनुमोदक - म्हाळू गावस मांडण्यात आला. संमेलनाच्या समारोप सोहळ्यात पूर्णिमा देसाई यांनी ठरवांचे वाचन केले.

समारोप सोहळ्यात संमेलन अध्यक्ष राजेंद्र केरकर यांनी संमेलनात मांडलेले ठराव मराठीच्या साहित्यिक सांस्कृतिक अभिवृद्धीसाठी महत्त्वाचे असून मराठी राज्यभाषा करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट केले. राज्य भाषेचा विषय ज्या पद्धतीने हाताळण्यात आला, तो चुकीच्या माहितीच्या आधारावर असून त्यामध्ये मगो अनेक चुका केलेले आहेत. तसेच खोटी माहिती देताना षड्यंत्र झाल्याची टीका राजेंद्र केरकर यांनी केली.

दिवसभराच्या संमेलनात अतिशय चांगली चर्चा झाल्याने युवाशक्तीला निश्चित नवी दिशा व ऊर्जा मिळाल्याचे व संमेलन त्या दृष्टीने यशस्वी झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धातील विजेत्यांना बक्षीस आहे. राजेंद्र केरकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली

दुपारी ’मराठी राजभाषेची अपरिहार्यता’ परिसंवादाचे अध्यक्ष पत्रकार परेश प्रभू अवित बगळे, मयुरेश वाटवे, शशिकांत सरदेसाई, स्टनली वाझ, उदय सावंत हे सहभागी झाले होते. गोमंतकीय युवक व मराठी राजभाषा’ या परिसंवादाचे अध्यक्ष साहित्यिक ॲड. भालचंद्र मयेकर हे असतील. या परिसंवादातील सहभागी वक्ते नवसो परब, अमेय किंजवडेकर, स्नेहा मोरजकर,निकीता शिरोडकर होते. या परिसंवादाचे सूत्रसंचालन अरविंद गावडे तर आभार प्रदर्शन प्रितंका सावंत यांनी केले.

या कवी संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. अनुजा जोशी तर समन्वयक डॉ. आरती दिनकर होत्या. या कवी संमेलनात सत्यवान पेडणेकर, अशोक लोटलीकर, शिवानंद बाक्रे, प्रमोद कारापुरकर, संदीप केळकर, मेघना भिडे, प्राची नाईक, अलिशा गडेकर नाईक, डॉ.जेनेट बोर्जिस, डॉ. ज्योती जोशी, किर्ती गावडे, प्रकाश ढवण, रेणूका देसाई, लक्ष्मण गुरव, संकेत पाडलोसकर, तनुजा नेवगी, निता परब, अनुराधा नाईक, महादेव गावस, जितेंद्र फडते, गुलाब वेर्णेकर हे कवी व कवयित्री सहभागी झाले होते.

समारोप सोहळ्यास व्यासपीठावर संमेलनाध्यक्ष राजेंद्र केरकर, स्वागताध्यक्ष अशोक घाडी, कार्याध्यक्ष ॲड. यशवंत गावस, प्रमुख कार्यवाह उदय ताम्हणकर, मराठी असे आमुची मायबोली प्रमुख प्रकाश भगत हे उपस्थित होते . साहित्य संमेलनानिमित्त घेतलेल्या निबंध स्पर्धेचा निकाल *डा. आरती दिनकर* यानी जाहीर केला . तसेच कविता स्पर्धेचा निकाल रेखा डायस यांनी दिला यावेळी सोडत पद्धतीने पाच मराठीप्रेमींची नावे काढली व त्यांना सन्मान चिन्ह देऊन त्यांचा गौरव या समारोप सत्राचे सूत्रसंचालन बाहुबली शेंदुरे तर आभार प्रदर्शन विनोद पोकळे यानी केले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १४१ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 141 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .